**Maharashtra University of Health Sciences, Nashik**

# Trust Deed / Bylaws/ Registration Certificate (Trust/ Hospital (Bombay Nursing Act))

**Faculty - NURSING**
**Name of College/Institute – Navnirman College of Nursing, Lovale, Sangmeshwar, Dist – Ratnagiri.**

| | | |
|---|---|---|
| Name of Trust / Society | | Navnirman Shikshan Sanstha's |
| Registration Certificate | | Trust /Society Society:-<br>Navnirman Shikshan Sanstha's<br><br>Hospital (Bombay Nursing Act):-<br>1. Parkar Hospital & Research Center<br>2. Matrumandir hospital Devrukh |
| Name of the College / Institute<br>(As per First Affiliation letter) | : | Navnirman College of Nursing |
| Address | : | A/P Lovale, Tal – Sangmeshwar,<br>Dist – Ratnagiri.<br>Pin – 415 611 |
| Email ID | : | nssnursing@gmail.com |
| Telephone/ MobileNo.(s) | : | 02354 299196/299192<br>9096134712 |
| Website | : | navnirmanedu.org |
| College Code | : | 151137(MUHS) |

Navnirman College of Nursing Lovale, Sangameshwar Ratnagiri

Principal
Navnirman College of Nursing.
Lovale - Sangameshwar
Ratnagiri.

**Dean / Principal Stamp & Signature**

बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमास मान्यता देण्याबाबत.

नवनिर्माण शिक्षण संस्था, मिरजोळे, जि.रत्नागिरी संचलित नवनिर्माण कॉलेज ऑफ नर्सिंग, मु.पो.लोवले, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक: एनयुआर-२०१८/प्र.क्र.१०४/१८/शिक्षण-१

९ वा मजला, नवीन मंत्रालय,गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.

दिनांक: १८ सप्टेंबर, २०१९.

वाचा : १) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/पी-५/१३९५/२०१७, दि. २०.१२.२०१७.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.एनयुआर-२०१७/प्र.क्र.२१२/१७/शिक्षण-१, दि. २८ फेब्रुवारी, २०१८.

३) संचालक, वैद्यकीय शिक्षण यांचे पत्र क्र.एनयुआर/ नवनिमार्ण शिक्षण संस्था, मिरझोळे, रत्नागिरी/बी.एस्सी./सक्षमता तपासणी/ई/खाजगी/११०९६/१९, दि.११.०७.२०१९.

प्रस्तावना:

नवनिर्माण शिक्षण संस्था, मिरजोळे, जि.रत्नागिरी संचलित नवनिर्माण कॉलेज ऑफ नर्सिंग, मु.पो.लोवले, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी या संस्थेचा बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.(१) येथील पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. तथापि, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली नव्हती. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ च्या कलम ६४(५) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन सदर नियोजित बी.एस्सी. (नर्सिंग) महाविद्यालयाची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्यामार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सक्षमता तपासणी समितीने उक्त संस्था बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास सक्षम असल्याची शिफारस केली आहे. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांचेकडून प्राप्त सदर शिफारस विचारात घेऊन, उक्त संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी ४० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी संदर्भ क्र. (३) अन्वये सक्षमता तपासणी समितीच्या अहवालाच्या आधारावर केलेली शिफारस विचारात घेऊन, नवनिर्माण शिक्षण संस्था,

Scanned with CamScanner

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१) महाराष्ट्र / २१२५ / रत्नागिरी

नोंदणी क्रमांक

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, ज्ञान निर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्य रीत्या नोंदणी करण्यात आली.

तारीख १८, डिसेंबर / १९९८ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

ASSTT. REGISTRAR OF SOCIETIES, RATNAGIRI AREA, RATNAGIRI

सहायक संस्था निबंधक, रत्नागिरी विभाग, रत्नागिरी

[signature] 18/12/1998

संस्थांचे सहायक निबंधक,
महाराष्ट्र राज्य [illegible] विभाग,
रत्नागिरी [illegible]

Verified from original

True copy

[signature]

Dr. Balaji Naracinva Kamat

Advisor

Nav [illegible]

Krishi Udyog Bhavan Bldg., M.I.D.C

Near Kuwarbav RATNAGIRI-415639

Tel, Off. 02352/30337

Res. 02352/34233

# नवनिर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी

कार्यालय: सी ४६ ,उद्यमनगर सह. संस्था, रत्नागिरी ४१५ ६३९ ☎ (०२३५२) २२३४०९

परिशिष्ट –'ब'

नवनिर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी.

या मंडळाचे मेमोरॅन्डम् ऑफ असोसिएशन.

---

१) संस्थेचे नांव :-नवनिर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी

२) संस्थेचा कार्यालयाचा पत्ता :- द्वारा-श्री अभिजित हेगशेट्ये , सी-४६ उद्यमनगर सहकारी संस्था ,रत्नागिरी ४१५ ६३९

३) संस्थेचे ध्येय व उद्देश :- (१) सर्वांना समान आणि समता मूल्याधिष्ठीत शिक्षणाच्या प्रसारासाठी प्रयत्न करणे. दृष्टीने प्राथमिक , माध्यमिक , उच्च माध्यमिक व महाविद्यालय, व्होकेशनल गायडन्स कोर्स आदी शैक्षणिक केंद्रे चालविणे.

(२) बहुजन वर्गाच्या तसेच समाजातील वंचित घटकाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न करणे.

(३) मुलामुलींसाठी वसतीगृहे , वाचनालये उभारणे.

(४) शैक्षणिक संशोधनासाठी आवश्यक ते सर्व उपक्रम राबविणे.

(५) शेती तंत्रज्ञान आणि विज्ञान या क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान सर्व थरापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे,

४) '' नवनिर्माण शिक्षण संस्था , रत्नागिरी या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची कारभार व जबाबदारी सोपविणेत आलेली आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदंची संपूर्ण नांव, पत्ते , हुद्दे, व्यवसाय, वय, राष्ट्रीयत्व, खालीलप्रमाणे आहेत.

| संपुर्ण नाव | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|
| १. कपिल हरीश्चंद्र पाटील | अध्यक्ष | ४२ | पत्रकारीता | यशवंत नगर, गोरेगाव पश्चिम, मुंबई |
| २. अभिजित श्रीराम हेगशेट्ये | चेअरमन | ४३ | पत्रकारीता | सी.४६, उद्यमनगर रत्नागिरी ४१५६३९ |
| ३. संदिप संभाजी निंबाळकर | उपाध्यक्ष | ३६ | वकील | एस/२३ संचयनी पॅलेस सावंतवाडी. |
| ४. प्रा. पांडुरंग लक्ष्मण येजरे | उपाध्यक्ष | ५४ | प्राध्यापक | दत्तमंदिर सबनिसवाडा सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग |
| ५. मोहन श्रीराम खातू | कार्यवाह | ४९ | उद्योजक | हॉटेल गोपाळ,मारुतीमंदिर रत्नागिरी ४१५६१२ |
| ६. सीमा विश्वनाथ बागुल | सहकार्यवाह | ३८ | उद्योजक | आदीत्य आपर्ट.शिवाजी नगर रत्नागिरी |
| ७. वर्षा लक्ष्मण कांबळे | सदस्य | ३८ | गृहीणी | यशवंत नगर, गोरेगाव पश्चिम, मुंबई |
| ८. शरद शांताराम कदम | सदस्य | ३८ | नोकरी | घाटकोपर , मुंबई |
| ९. सुरेश हरीश्चंद्र पेडणेकर | सदस्य | ४६ | नोकरी | शिवाजी नगर ,रत्नागिरी |
| १०. डॉ. बालाजी नरसिंह कामत | सदस्य | ६५ | निवृत्त | जबीन पॅलेस , उद्यमनगर ,रत्नागिरी |
| ११. सौ. सोनाली संदिप निंबाळकर | सदस्य | २९ | गृहीणी | एस/२३ संचयनी पॅलेस सावंतवाडी . |

नवनिर्माण शिक्षण संस्था
कार्यालय : सी ४६, उद्यमनगर सह.संस्था, रत्नागिरी ४१५ ६३९ ☎(०२३५२) २३४०९

# परिशिष्ट – ''क''
# ''नवनिर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी''
# या मंडळाचे नियम व नियमावली.

---

१) **नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :-**

अ) संस्था किंवा मंडळ म्हणजे ''नवनिर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी'' होय.
ब) कार्यकारी मंडळ म्हणजे संस्थेने नियुक्त केलेले कार्यकारी मंडळ.
क) पदाधिकारी म्हणजे ''नवनिर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी'' या अध्यक्ष, चेअरमन, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, सहसेक्रेटरी व खजिनदार व कार्यकारी मंडळ जी पदे निर्माण करेल ती धारण करणाऱ्यांना पदाधिकारी म्हटले जाईल.
ड) कार्यकारी मंडळांचा सभासद म्हणजे ''नवनिर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी,'' या संस्थेचा कोणताही प्रकारचा किमान तीन वर्ष सलग सभासद असलेला आणि ज्याला सर्वसाधारण सभेने निवडून दिले आहे तो.

२) **कार्यक्षेत्र :-** या मंडळाचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असे राहील.

३) **हिशोबाचे वर्ष :-** हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

४) **सभासद व त्यांची नोंदणीची पध्दत :-**
१) भारतीय संविधानाच्या सारनाम्यावर श्रध्दा असणाऱ्या पुरोगामी विचारांची बांधिलकी मानणाऱ्या आणि जातीयवादी व धर्मवादी संघटनांचा सभासद नसणाऱ्या १८ वर्षे पूर्ण झालेल्या कोणाही भारतीय व्यक्तीस कार्यकारी मंडळाचे संमतीने सभासद होता येईल.
२) सभासद होण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज मंडळाच्या सेक्रेटरीकडे करावयांचा आहे. या अर्जास कार्यकारी मंडळाने मंजूरी दिल्यानंतर आवश्यक ती वर्गणी भरल्यानंतर त्या त्या पध्दतीचे सभासदत्व त्याला स्विकारता येईल. एखाद्याला सभासदत्व नाकारण्याचा तसेच संस्थेच्या ध्येय उद्दीष्टांशी विसंगत भूमिका घेणाऱ्या सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील.

५) **सभासदांचे प्रकार :-**
१) सामान्य सभासद :- दर वर्षी रुपये १००/- वार्षिक वर्गणी देणाऱ्या व्यक्तीस सामान्य सभासद समजण्यात येईल.
२) आजीव सभासद :- रक्कम रुपये ५०००/- देणाऱ्या व्यक्तीस आजीव सभासद समजण्यात येईल.(एकदाच रक्कम भरणे)
३) संस्थापक सभासद :- संस्थेच्या स्थापनेपासून संस्था निर्मितीसाठी कारणीभूत झालेले सुरूवातीचे सभासद यांना संस्थापक सभासद समजण्यात येईल. अशा सभासदास कोणत्याही प्रकारची वर्गणी आकारणी केली जाणार नाही.

६) **सभासदत्व रद्द होणेबाबत :-**
१) सामान्य सभासदाने वर्ष संपूनही वार्षिक वर्गणी ३ महिन्यांच्या आत न भरल्यास.
२) कार्यकारणींचा सभेस सलग ३ वेळा काहीही सूचना न देता कार्यकारणींचा सभासद गैरहजर राहील्यास.
३) राजीनामा दिल्यास, मृत्यू पावल्यास, मानसिकदृष्ट्या अपात्र ठरल्यास अथवा फौजदारी गुन्ह्यांची सजा झाल्यास.
४) मंडळाच्या हिताविरूध्द अगर बदनामी होणाऱ्या वर्तणूकीस सभासद कारणीभूत ठरल्यास कार्यकारी मंडळाच्या

बहुमताने सभासदत्व रद्द होईल. परंतू अशा सभासदास त्यांची बाजू मांडण्याची पूर्ण संधी दिली जाईल.
५) मंडळाचे नियम, आदेश, निवाडा न पाळल्यास.
६) मंडळाच्या घटनेनुसार दिलेली जबाबदारी पार पाडण्यास असमर्थ ठरल्यास.

७) **सर्वसाधारण सभा व तिचे अधिकारी आणि कार्ये :-**
१) दर वर्षातून एकदा तरी सर्वसाधारण सभा बोलाविली जाईल.
२) मंडळाचे पुढील वर्षाचे अंदाजपत्रक, वर्षअखेर जमाखर्च, ताळेबंद पत्रक व वार्षिक अहवाल विचार विनिमय करून मंजूर करणे.
३) कार्यकारी मंडळाचे सदस्य व पदाधिकारी निवडणे.
४) मंडळाचे कार्यक्रम मंजूर करणे.
५) उपस्थित सभासदांच्या २/३ बहुमताने घटनेतील बदल मंजूर करणे.
६) कार्यकारी मंडळ विश्वासपात्र नसल्यास बरखास्त करून नविन कार्यकारी मंडळाची निवड करणे.
७) सर्वसाधारण सभा ही मंडळांची सर्वश्रेष्ठ व शेवटचा निर्णय देणारी सभा म्हणून समजली जाईल.

८) **सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :-**
१) सर्वसाधारण सभेची लेखी सूचना सभासदांना १५ दिवस अगोदर त्यांची सही घेऊन किंवा पोष्टाने पोष्टाचा दाखला घेऊन देण्यात येईल.
२) नोटीसमध्ये स्थळ, वेळ, दिनांक, कोरम, विषयसूची इत्यादी बाबींचा उल्लेख करावयाचा आहे.
३) सभासद पटावरील २/३ किंवा २५ यापैकी जी संख्या कमी असेल ती सभासद संख्या सर्वसाधारण सभेसाठी कोरम समजली जाईल. कोरम अभावी तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी व त्याच दिवशी अर्ध्या तासाने तीच सभा त्याच सभेचे अध्यक्ष बोलावू शकतील. अशा तहकूब सभेस नंतर कोरमची अट असणार नाही.

९) **विशेष सर्वसाधारण सभा व तीचे कार्य :-**
कोणतीही महत्वाची बाब सर्व सभासदांपुढे मांडावयाची झाल्यास कार्यकारी मंडळ अथवा सभासद पटावरील १/५ सभासदांनी लेखी मागणी केल्यास मागणी केल्यापासून १५ दिवसांच्या आत अध्यक्षांनी विशेष सर्वसाधारण सभा बोलाविली नाही तर मागणी करणाऱ्यांपैकी एक, मागणी करणाऱ्यांच्या सर्वानुमते अशी सभा बोलावू शकतील. विशेष सर्वसाधारण सभेत नोटीसीवर नमूद केलेली तातडीचीच कामे विचार विनिमय करून निर्णय घेतला जाईल.

१०) **मंडळाचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी व त्यांची रचना :-**
या मंडळाचे कार्यकारी मंडळ कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १५ सभासदांचे राहील. कार्यकारी मंडळात खालीलप्रमाणे पदाधिकारी व सभासद असतील.

| | |
|---|---|
| १) अध्यक्ष - १ | ५) खजिनदार - १ |
| २) चेअरमन - १ | ६) सह सेक्रेटरी - १ |
| ३) उपाध्यक्ष - २ | ७) इतर कार्यकारणी सदस्य. |
| ४) सेक्रेटरी - १ | |

११) **कार्यकारी मंडळांचा कार्यकाळ व निवडणूकीची पध्दत :-**
कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ हा ५ वर्षाचा राहील दर ५ वर्षांनी मंडळांच्या सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळांचा पदाधिकाऱ्यांची व सभासदांची निवड करणेत येईल.

१२) **कार्यकारी मंडळांचे पदाधिकारी व त्यांची कामे :-**
**अध्यक्ष :-** वार्षिक सभेचे अध्यक्षस्थान भूषविणे. तसेच संस्थेला प्रतिष्ठा व विस्तार यासाठी सहाय्यभूत होणे.

वार्षिक सभेत निर्णायक मताचा (कास्टींग व्होट) अधिकार त्यांना राहील.

**चेअरमन :–** हा संस्थेचा कार्यकारी अधिकार असलेला प्रमुख असेल. कार्यकारी मंडळाची सभा बोलाविणे दैनंदिन कारभारावर नियंत्रण ठेवणे. विश्वस्त मंडळाची सभा बोलाविणे. तसेच संस्थेच्या इतर कामाचे उत्तरदायित्व त्याचेवर असेल. आवश्यक वाटेल त्यावेळी मंडळांचे हिशोब, रेकॉर्ड तपासणे व सही करणे. जरूर वाटल्यास स्वत:च्या अधिकारात सभा बोलावणे. रूपये २५,०००/- पर्यंतच्या योजना वा तत्सम खर्चाला मंजूरी देणे.

**उपाध्यक्ष :–** अध्यक्षांच्या गैरहजेरीत त्यांचे काम व इतर वेळी अध्यक्षांना त्यांच्या कामकाजात मदत करणे.

**सेक्रेटरी :–**

१) मंडळांचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम पाहणे.

२) मंडळाचे अंदाजपत्रक वर्षअखेर जमाखर्च, ताळेबंद व वार्षिक अहवाल तयार करून सभेपुढे ठेवणे. मासिक खर्चाचे पत्रक कार्यकारी सभेपुढे. मंडळाच्या खर्चासाठी बँकेतून रकमा काढणे, भरणे.

३) मंडळांचे दप्तर सांभाळणे. पत्रव्यवहार पाहणे, सभांचे इतिवृत्त लिहिणे, चेअरमनच्या संमतीने सभेच्या नोटीसा पाठविणे, सभासद रजिस्टर ठेवणे. मंडळांचे डेडस्टॉक रजिस्टर ठेवणे.

४) मंडळासाठी रूपये ५००/- पर्यंत रक्कम आपल्या अधिकारांत खर्च करू शकतील. मात्र त्या पुढील खर्चास चेअरमनची मंजूरी घ्यावयाची आहे.

**सहसेक्रेटरी :–**

सेक्रेटरीच्या गैरहजेरीत त्याचे काम व इतर वेळी सेक्रेटरी यांना त्यांच्या कामकाजात मदत करणे.

**खजिनदार :–**

१) मंडळांचा दैनंदिन आर्थिक व्यवहार पाहणे. बँकेतून रकमा काढणे, भरणे, तदनुषंगाने संबंधित कागदपत्रे सांभाळणे.

२) मंडळाचे दैनंदिन खर्चासाठी रूपये २०००/- पर्यंत रक्कम आपल्या हातात ठेवू शकेल.

३) अंदाजपत्रक, जमाखर्च ताळेबंद व आर्थिक अहवाल तयार करणेसाठी सेक्रेटरी यांना मदत करणे. व ते सनदी लेखापाल, लेखा परीक्षक यांचेकडून तपासून घेऊन संबंधित कार्यालयांस सादर करणे.

४) मंडळासाठी निधी गोळा करणे.

१३) **कार्यकारी मंडळांची सभा व मागणींची सभा :–**

कार्यकारी मंडळांची सभा सर्वसाधारणपणे तीन महिन्यांपूर्वी एकदा बोलाविली जाईल. आवश्यकता वाटल्यास जादा सभासदांच्या मागणीनुसार बोलाविणेत येईल. जादा सभेसाठी लेखी सही घेऊन, दोन दिवस अगोदर कार्यकारणींच्या सदस्यांना सूचना देणेत येईल.

१४) **कार्यकारणी मंडळांच्या सभेची सूचना व गणसंख्या :–**

१) कार्यकारणी मंडळाच्या सभेसाठी सर्व कार्यकारणींच्या सभासदांना ५ दिवस अगोदर लेखी नोटीस देऊन किंवा पोस्टाने पोष्टाचा दाखला घेऊन नोटीस पाठविणेत येईल. नोटीसमध्ये स्थळ, वेळ, दिनांक, विषयसूची

यांचा समावेश असेल.

२) कार्यकारी मंडळाच्या सभेसाठी २/३ एवढा कोरम सभासद संख्या आवश्यक राहील. कोरम अभावी तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी बोलाविली जाईल. त्या सभेचे अध्यक्ष तीच सभा १ तासाने घेऊ शकतील. अशा तहकूब सभेस कोरमची अट असणार नाही.

१५) **कार्यकारी मंडळांच्या निवडणूकीचे नियम :-**

दर पाच वर्षांनी सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळांच्या व सभासदांची निवड करणेत येईल. निवड बहुमताने करणेत येईल. गरज भासल्यास गुप्त मतदान पध्दतीने निवड करणेत येईल.

१६) **कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :-**

कार्यकारी मंडळातील एखादी जागा कोणत्याही कारणाने रिकामी झाल्यास ती जागा उर्वरित कार्यकारी मंडळ बहुमताने पुढील निवडणुकीपर्यंत बहुमताने भरून घेऊ शकेल. अशा भरलेल्या जागेची मुदत कार्यकारणीच्या सदस्यत्वा एवढीच राहील.

१७) **कार्यकारी मंडळांचे अधिकार व कर्तव्ये :-**

१) मंडळाचे मंजूर झालेले कार्यक्रम आमलांत आणणे.
२) रिक्त झालेल्या कार्यकारी मंडळातील जागा भरणे.
३) मंडळाचे जमाखर्च, ताळेबंद, वार्षिक अहवाल सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस ठेवणे.
४) उप कमिट्या नेमणे, त्यांचे काम ठरविणे व बरखास्त करणे.
५) नोकरवर्गाची नेमणूक करणे, बढती देणे, कायम करणे, ताकीद देणे, काढून टाकणे.
६) आखणी केलेली कामे व कार्यक्रम योग्य तऱ्हेने राबविणे.

१८) **मंडळाचा निधी, मिळकत व विनियोग :-**

मंडळाला मिळालेल्या देणग्या, सभासद वर्गणी, अनुदान इत्यादी सर्व बाबींचा समावेश मंडळांच्या निधीत होईल. मंडळाच्या उद्देशपूर्तीसाठीच खर्च करणेत येईल.

१९) **उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतूद :-**

मंडळांच्या मेमोरॅन्डम् ऑफ असोसिएशनमध्ये दर्शविलेल्या सर्व उद्देशांवर समान टक्केवारीने खर्च करणेत येईल. तथापि विशिष्ट उद्देशासाठी गोळा करणेत आलेला निधी त्याच उद्देशासाठीच खर्च करणेत येईल.

२०) **कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद :-**

मंडळाला कर्ज किंवा ठेवी स्विकारावयाच्या झाल्यास मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३६ प्रमाणे मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची पूर्व परवानगी घेणेत येईल.

२१) **स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करण्याबाबत तरतूद :-**

मंडळासाठी कार्यकारी मंडळाच्या ठरावाने संमतीने स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करता येईल. मात्र विक्री करण्यापूर्वी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३६ प्रमाणे मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची पूर्व परवानगी घेणेत येईल.

२२) **बँक खाते :-**

कोणत्याही सार्वजनिक न्यासांच्या ठेवी स्वीकारणेस शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही सहकारी

किंवा राष्ट्रीयकृत बँकत ठेवण्यात येतील. खात्यावरील आर्थिक व्यवहार कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष व सेक्रेटरी खजिनदार यांच्या संयुक्त सहिने करणेत येतील.

२३) **सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :-**

मंडळाच्या सभासदांची व नोकरवर्गाची यादी सन १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमामध्ये उल्लेख केलेल्या अनुसूचित ठेवण्यात येईल.

२४) **नियम व नियमावलीतील बदल करण्याची तरतूद :-**

सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या २/३ बहुमताने घटनेत बदल मंजूर करणेत येईल. असा झालेला बदल मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रत्नागिरी यांचे कार्यालयात परि-३ मध्ये अर्ज करून मंजूर करून घेतला जाईल.

२५) **मंडळाच्या नावात व उद्देशात बदल करण्याची तरतूद :-**

मंडळाच्या नावात अथवा उद्देशात कोणताही बदल अथवा दोन किंवा अधिक संस्थांचे विलिनिकरण करावयाचे असल्यास संस्था नोंदणी अधिनियम, १८६० चे कलम १२ व १३ अ मधील तरतूदीप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

२६) **विसर्जन :-**

मंडळ कोणत्याही कारणाने बंद अगर बरखास्त करावयाचे असल्यास संस्था नोंदणी अधिनियम, १८६० चे कलम १३ व १४ प्रमाणे पूर्तता करून कार्यवाही करणेत येईल.

*********

नवनिर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी

या मंडळाचे मेमोरेंडम ऑफ असोसिएशन बदल तक्ता

| अनुक्रमांक | जुनी घटना | नवी घटना | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | जुनी घटना<br>संस्थेचा ध्येय व उद्देश<br>1) सर्वांना समान आणि मुल्याधिष्ठीत शिक्षणाच्या प्रसार साठी प्रयत्न करणे.<br>2) या ध्येयाच्या उद्दीष्टासाठी अभिनव व अद्यावत पध्दतीने शिक्षण प्रसार करण्याचे दृष्टीने प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक व महाविद्यालय, व्होकेशनल, गायडन्स कोर्स आदी शैक्षणिक केंद्र चालविणे.<br>3. बहुजन वर्गाच्या तसेच समाजातील वंचित घटकाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न करणे.<br>4. मुलांमुलींसाठी वसतीगृहे, वाचनालये उभारणे<br>5. शैक्षणिक संशोधनासाठी आवश्यक ते सर्व उपक्रम राबविणे<br>6) शेती तंत्रज्ञान आणि विज्ञान या क्षेत्रातील अद्यावत ज्ञान सर्व थरापर्यंत | घटना नवे बदल<br>संस्थेचे ध्येय व उद्देश<br>1) सर्वांना समान आणि मुल्याधिष्ठीत शिक्षणाच्या प्रसारासाठी प्रयत्न करणे.<br>2) या ध्येयाच्या उद्दीष्टासाठी अभिनव व अद्यावत पध्दतीने शिक्षण प्रसार करण्याचे दृष्टीने पुर्व प्राथमिक, प्राथमिक व उच्चमाध्यमिक व महाविद्यालयीन व्होकेशनल गायडन्स कोर्स आदी शैक्षणिक अभ्यासक्रम चालविणे.<br>3) मेडीकल : या अंतर्गत नर्सिंग, ऑर्थोपेडीक, पॅरामेडीकल, मेडीकल, डेंटल पदवी, पदव्यूत्तर, डिप्लोमा, व्होकेशनल अभ्यासक्रम सुरु करणे आणि चालविणे.मेडीकल कॉलेज सुरु करणे, मेडीकल अंतर्गत विविध कोर्सेस सुरु करणे आणि चालविणे<br>4) लॉ (कायदा)आणि इंजिनिअरींग, समाजशास्त्र महाविद्यालय शैक्षणिक उपक्रम सुरु करणेआणि चालविणे.<br>6) मुलांमुलींसाठी वसतीगृहे, वाचनालये उभारणे<br>7) ग्रामिण,शहरी भागात वैद्यकिय सुविध पुरविण्यासाठी मेडीकल, डेंटल हॉस्पीटल उभारणे आणि चालविणे. गरीब आणि वंचीत घटकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळण्यासाठी विविध प्रकारचे मेडीकल कॅम्प आयोजीत करणे<br>8) शैक्षणिक संशोधनासाठी आवश्यक ते सर्व उपक्रम राबविणे<br>9) शेती तंत्रज्ञान आणि विज्ञान या क्षेत्रातील अद्यावत ज्ञान सर्व थरापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीने कृषि शैक्षणिक, कृषि पर्यटन आदी उपक्रम, महाविद्यालय, डिप्लोमा आदी शैक्षणिक उपक्रम राबविणे<br>10). क्रिडा : क्रिडा क्षेत्रात विद्यार्थ्यांना अधिक संधी आणि प्रोत्साहन देण्यासाठी विविध क्रिडा स्पर्धांचे अयोजन करणे, स्पोर्टस कॉम्प्लेक्स उभारणे, स्विमींग पुल उभारणे आणि चालविणे.<br>9. अपंग, मतीमंद, अंध आदी समाजातील दुर्बल घटकासाठी शिक्षण आणि | |

Chairman
Navnirman Shikshan Sanstha

पुढील पानावर पहा.....

## नवनिर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी
### या मंडळाचे मेमोरेंडम ऑफ असोसिएशन बदल तक्ता

| अनुक्रमांक | जुनी घटना | नवी घटना | शेरा |
|---|---|---|---|
| | | सामाजिक सलग्नतेचे विविध उपक्रम राबविणे<br>10) तरुण आणि महिलांसाठी (स्किलबेस) कौशल्याधारीत शिक्षण आणि रोजगाराभिमुख कोर्सेस, उपक्रम राबविणे<br>11) गरीब आणि असाह्य मुलांसाठी तरुणांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविणे, सांस्कृतीक उपक्रम आयोजित करणे,<br>12) साहित्य , कला, क्रिडा क्षेत्रातील नवोदितांना सहाय्य करणे त्यांची पुस्तके प्रकाशन करणे, मासिक अथवा अनियतकालीक प्रकाशित करणे त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध संमेलने, कार्यक्रम, पब्लिक शो चे आयोजन करणे इत्यादी.<br>13) अद्ययावत शिक्षण देणारी ऑनलाईन वेब पोर्ट, यूट्यूब चॅनल, कम्युनिटी रेडीओ स्टेशन आदी विविध उपक्रम कोर्सेस चालविणे | |

Chairman
Navnirman Shikshan Sanstha
Ratnagiri

Navnirman Shikshan Sanstha
Ratnagiri

सन १९४९ च्या दि बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्टच्या कलम ५ अन्वये दिलेले रजिस्टेशन सर्टिफिकेट

Certificate of Registratration under Section 5 of the Bombay Nursing homes Registration Act 1949

(नियम ५ अन्वये )

**(Under Rule 5)**

क्रमांक :

**No. : 95 /2022**

दि बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट, १९४९ अन्वये श्री./श्रीम.-------------------------- ---------------------------- यांचे ---------------------------------------------------------------------- ----- येथील नर्सिंग होम/मॅटर्निटी होम रजिस्टर केले असून सदरचे नर्सिंग होम व मॅटर्निटी होम चालविण्यास परवानगी देण्यात येत आहे.

This is to certify that Shri/Smt **DR. PRAKASH CHANDRAKANT PATIL** has been registered under the Bombay Nursing Homes Registration Act, 1949 in respect of **MATRUMANDIR HOSPITAL** situated at **DEVRUKH** and has been authorised to carry on the said Nursing Home. as per 1 to 11 rules & regulations enclosed.

| | | | |
|---|---|---|---|
| रजिस्ट्रेशन क्रमांक : | प्रसूतीसाठी | | खाटा |
| Registration No.: **95** | Maternity | **30** | Cots |
| रजिस्ट्रेशन दिनांक | इतर रुग्णांसाठी | | खाटा |
| Date Of registration **06-04-2022** | Other Nursing Patients | **90** | Cots |

ठिकाण Place : **MATRUMANDIR HOSPITAL,**
**TAL.SANGMESHWAR DIST.RATNAGIRI- 416702**

सर्टिफिकेट दिल्याचा दिनांक:

Date of Issue of Certificate: **06-04-2022**

सदरचे सर्टिफिकेट दिनांक ३१ मार्च ---------------- पर्यंत कार्यवाहीत राहील.

This Certificate shall be valid upto **31 March 2025**

GENERAL HOSPITAL RATNAGIRI

जिल्हा शल्यचिकित्सक रत्नागिरी
सामान्य रुग्णालय रत्नागिरी.

सन 1949 च्या दि बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्टच्या कलम 5 अन्वये दिलेले रजिस्टेशन सर्टिफिकेट

Certificate of Registratration under Section 5 of the Bombay Nursing homes Registration Act 1949

(नियम 5 अन्वये )

**(Under Rule 5)**

क्रमांक :

**No. : 10 /2020**

दि बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट, 1949 अन्वये श्री./श्रीम.---------------------------------------------------------- यांचे ------------------------------------------------------------------------------ येथील नर्सिंग होम/मॅटर्निटी होम रजिस्टर केले असून सदरचे नर्सिंग होम व मॅटर्निटी होम चालविण्यास परवानगी देण्यात येत आहे.

This is to certify that Shri/Smt **DR. ALIMIYA DAUD PARKAR** has been registered under the Bombay Nursing Homes Registration Act, 1949 in respect of **PARKAR HOSPITAL AND RESEARCH INSTITUTE Pvt.Ltd.** situated at **RATNAGIRI** and has been authorised to carry on the said Nursing Homeas per 1 to 11 rules & regulations enclosed.

| | | | |
|---|---|---|---|
| रजिस्ट्रेशन क्रमांक :<br>Registration No.: **10** | प्रसूतीसाठी<br>Maternity | 32 | खाटा<br>Cots |
| रजिस्ट्रेशन दिनांक<br>Date Of registration **30-03-2020** | इतर रुग्णांसाठी<br>Other Nursing Patients | 70 | खाटा<br>Cots |

ठिकाण Place : 828, Shivaji Nagar
Ratnagiri Tal. Dist.Ratnagiri.

सर्टिफिकेट दिल्याचा दिनांक:
Date of Issue of Certificate: **30-03-2020**

सदरचे सर्टिफिकेट दिनांक 31 मार्च ---------------- पर्यंत कार्यवाहीत राहील.
This Certificate shall be valid upto **31 March 2023**

Date **30-03-2020**
**Ratnagiri**

GENERAL HOSPITAL RATNAGIRI

**CIVIL SURGEON, RATNAGIRI**

Civil Surgeon, Ratnagiri

रुग्णालय चालविताना प्रामुख्याने खालील बाबींची दक्षता घेण्यात यावी.

१) रुग्णालयात निर्माण होणा-या जैव वैद्यकिय कच-याची योग्य त-हेने विल्हेवाट लावण्यात यावी.

२) रुग्णालयाच्या शस्त्रक्रियागृहाचे वेळोवेळी निर्जंतुकीकरण करण्यात यावे.

३) दैनंदिन शस्त्रक्रिया करताना शस्त्रक्रियागृह संबंधात असलेल्या मार्गदर्शक सूचनांचे वेळोवेळी पालन करावयाचे आहे.

४) रुग्णालयात वापरली जाणारी उपकरणे व साधनसामुग्री सुस्थितीत असल्याची खातरजमा करावी.

५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे बायो मेडीकल वेस्ट अँण्ड हँडलिंग रुल्स् १९९८ बाबतच्या प्रमाणपत्राचे नुतनीकरण वेळेत करण्याची जबाबदारी आपली राहिल तपासणीच्या वेळी सदर प्रमाणपत्राचे नुतनीकरण केल्याचे आढळून न आल्यास आपले नर्सिंग होम रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

६) रुग्णालयातील अग्निशमन यंत्रणा चालू आहे याबाबत वेळोवेळी खात्री करावी. तसेच अग्निशमन दंडगोल (Fire Extinguisher) वेळेत पुर्नभारीत (Rifiling)करावेत.

७) रुग्णालयात नोंदणी होणा-या गरोदर माता तसेच होणा-या प्रसुती यांची दरमहा माहीती नजिकच्या शासकिय रुग्णालयात रुग्णाचे नाव ,पत्ता,आधार कार्ड नंबर यासह सादर करावी व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

८) आपले रुग्णालयात होणा-या लसीकरणाची माहीती लाभार्थ्याचे नाव व पत्त्यासह तसेच देण्यात आलेली लस इ.बाबतची माहीती दरमहा नजीकच्या शासकिय रुग्णालयास व या रुग्णालयास सादर करावी.

९.) प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे रुग्णालयास कार्यरत वैद्यकिय अधिकारी व अधिपरीचारीका यांचे वैध एम.एम.सी व एम.एन.सी रजिस्ट्रेशन एक महिन्याच्या आत प्राप्त करुन घेणे व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.खाटांच्या प्रमाणात नर्सिंग कर्मचा-यांचे प्रमाण कायम राहणे आवश्यक राहील.

१०) सदर प्रमाणपत्राची वैधता संपण्यापुर्वी तीन महिने अगोदर नुतनीकरण प्रस्ताव या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

११) सादर केलेल्या माहीतीमध्ये काही तफावत आढळून आल्यास सदरचे प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

जिल्हा शल्य चिकित्सक,रत्नागिरी.

Civil Surgeon, Ratnagiri